आर.सी.सी. क्र.२८१/२०२२
नि.क्र.७६

**सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. १० यांचा पुरावा**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नांव – प्रकाश बळवंत बोरुडे

वय – ५९ वर्षे, व्यवसाय – कॅशिअर सेंट्रल बॅंक सध्या शाखा पिंपळगाव पिसा ,

राहणार–सुतार गल्ली ता.पारनेर.

**सरतपासणी सहा. सरकारी अभियोक्ता श्री.एस.ए. पटेकर यांचेमार्फत**–

मी सेंट्रल बॅंक ऑप इंडिया शाखा वडझिरे येथे कॅशिअर म्हणुन सन २००८–२०२१ पावेतो कार्यरत होतो. कॅशिअरचे कॅश घेणे व कॅश देणे हे काम असते. बॅंकेत असताना माझ्यावर काही कारवाई किंवा निलंबन झाले नव्हते. गौतम जाधव हा सेंट्रल बॅंक ऑफ इंडिया शाखा वडझिरे येथे बॅंक मित्र म्हणुन माझ्या अगोदरपासुन बॅंकेत कार्यरत होता. सन २०२१ सदर बॅंकेत कोण कॅशिअर होते हे मला सांगता येणार नाही. गौतम जाधव खाते उघडणे व पैशाची देवाण–घेवाण करण्याचे काम करीत होता. बॅंकेत सगळ्यांशी त्याचे व्यवस्थित संबंध होते व तो सगळ्यांच्या टेबलवर काम करायचा. डिपॉझिट पावत्या तयार करणे, लोकांचे पैशे देणे–घेणे असे काम गौतम जाधव अगोदर त्याच्या लॅपटॉपवर करायचा व त्यानंतर तो बॅंकेच्या कॉम्प्युटरवर काम करायला लागला. आरोपी पाडळीदर्या येथे राहण्यास होता. बॅंकेतील ग्राहक त्यांचे काम लवकर होण्यासाठी गौतम जाधवकडे बॅंकेत जायचे व त्यांनी दिलेले पैसे तो त्याच्या खात्यावर वर्ग करायचा.

त्यानंतर सन २०२१ मध्ये एक ग्राहक आले. त्यांची मुदत ठेव पावती होती. मुदत ठेव पावतीची मॅच्युरीटी झाली असल्याने त्यांना पैशांची आवश्यकता होती. ते ती पावती घेऊन मॅनेजर सोनाली मॅडमांकडे गेले. त्यावेळी सोनाली मॅडम व विद्या उघडे मॅडम शाखा अधिकारी होत्या. सोनाली मॅडम प्रसुती रजेवर गेल्यावर उघडे मॅडमांकडे कार्यभार होता. सोनाली मॅडमाने त्या ग्राहकास पावती पाहुन सांगितले की, तुमचे अकाऊन्ट नाही, तुमच्या नावावर पैसे नाही, ही पावती तुम्हाला खोटी दिली आहे. त्यांनी ती पावती कॉम्प्युटरवरुन पाहिली. त्या ग्राहकाने मॅनेजरकडे आमच्या शाखेत तक्रार केली व त्यानंतर हेड ऑफिस एम.आय.डी.सी सावेडी येथे तक्रार केली. ती

तक्रार गौतम जाधव याने केलेल्या फसवणुकी संदर्भात होती. त्यानंतर हेड ऑफिस मधील अधिकाऱ्याने गौतम जाधववर कारवाई केली. या घटनेमुळे बँकेचे नाव खराब झाले, ग्राहकांची, बँकेची व स्टाफची फसवणूक झाली. दि.२०/०५/२०२१ रोजी मला पोलिसांनी जबाबासाठी बोलवले होते. पोलिसांनी माझ्या सांगितल्याप्रमाणे जबाब लिहिला होता व तो मी वाचुन पाहिला होता. गौतम जाधव आज रोजी न्यायालयात हजर आहे.

सरतपास संपला.

**<u>आरोपीतर्फे उलटतपास विधीज्ञ श्री.एस.एल.ठाणगे यांच्यामार्फतः</u>**

मी ३५ वर्षापासून सेंट्रल बँकेत काम करीत आहे. मी १२ वर्षे वडझिरे शाखेत काम करीत होतो. मी वडझिरे शाखेत केवळ कॅशिअर पदावर काम केले. हे म्हणणे खरे आहे की, घटनेनंतर बँकेने माझी बदली दुसऱ्या ठिकाणी केली. आरोपी यास बँकेमार्फत बँक मित्र म्हणुन काम दिले होते. तो बँकेत काम करायचा. त्याला फिल्ड वर्क दिले नव्हते. बँक फ्रेंड नियुक्त करण्याबाबत बँकेचे वरीष्ठ कार्यालयाकडुन सुचना असतात. गौतम जाधव यास बँकेत बँक मित्र म्हणुन काम करण्यासाठी अधिकाऱ्याने त्याला सुचना दिली असणार. घटनेनंतर बँक मार्फत कार्यालयीन चौकशी चालु झाल्याचे मला माहित नाही.

प्रश्न – तुमचीही कार्यालयीन चौकशी झाली होती?

उत्तर– निष्काळजीपणा संदर्भात माझी चौकशी झाली होती.

हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर काही दिवसांसाठी बँकेने मला निलंबित केले होते. सेंन्ट्रल बँक ऑफ इंडिया शाखा वडझिरे येथे अगोदर गोण्याल नावाचे मॅनेजर होते. ते २००७–०८ च्या दरम्यान मॅनेजर होते.

प्रश्न – गोण्याल मॅनेजर असताना त्यावेळेस बँकेत कोणता अफार झाला होता का?

उत्तर – याबाबत मी सांगु शकत नाही. मी सांगतो की, कोणावर ताशेरे ओढले नव्हते. गोण्याल मॅनेजर त्यावेळी निलंबित झाले असल्याचे मला माहित नाही. त्यामध्ये माझा काही संबंध नव्हता.

प्रश्न – तुमच्यावर त्यावेळेस कारवाई झाली होती का?

उत्तर – नाही.

प्रश्न – तुम्ही जे सांगितले की, बँकेतील कर्मचाऱ्याने सांगितलेले काम आरोपी करायचा तर आरोपी हा बँक कर्मचारी होता का?

उत्तर – आरोपी बँक मित्र म्हणुन बँकेत होता व त्यास बँकेतील अधिकाऱ्याने दिलेले बँक मित्र म्हणुन काम तो करायचा.

आरोपी हा कोणत्या कंपनीमार्फत बँक मित्र म्हणुन सेंन्ट्रल बँकेत नेमला होता हे मला सांगता येणार नाही. कारण ती वरीष्ठ अधिकाऱ्याने नेमणूक केली होती. हे म्हणणे खरे आहे की, जो बँक मित्र असतो त्याला एक CSC Code व Money Pay Account असते. बँक मित्र यास CSC Code व Money Pay Account वरुन किती रुपयांचा व्यवहार करण्याचे अधिकार असतात हे मला माहित नाही.

प्रश्न – हे म्हणणे बरोबर होईल का की, आरोपीने त्याच्या CSC Code व Money Pay Account वरुन किती रुपयांचा अपहार केला हे तुम्हाला सांगता येणार नाही?

उत्तर – त्याने तसे केले नाही. आरोपीने लोकांकडून पैसे घेऊन ते स्वतःच्या खात्यावर टाकले. CSC Code व Money Pay Account वरुन किती रुपयांचा अपहार केला याबाबत मी सांगु शकत नाही.

प्रश्न – अपहार हा केवळ बँकेत झाला?

उत्तर – अपहार बँकेतही झाला व बाहेरही झाला.

आरोपी बँकेत बँक अधिकाऱ्यांच्या परवानगीने बसत असल्याबाबत वरीष्ठ अधिकाऱ्यांशी तसा पत्रव्यवहार बँकेने केल्याबाबत मला सांगता येणार नाही.

प्रश्न – तुम्ही बँकेतील अधिकाऱ्यांना आरोपी काम करण्यासंदर्भात कळवले होते का?

उत्तर – त्यांना सांगितले होते. मी त्यांना समक्ष सांगितले होते.

मी सांगितल्यावर बँक अधिकाऱ्यांनी कारवाई केली होती. काय कारवाई केली व कधी केली हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, बँक कर्मचारी व कॅशिअर यांना व्यवहार करण्यासाठी बँकेने आता आय.डी व पासवर्ड दिला आहे.

प्रश्न ज्यावेळी घटना घडली त्यावेळीही आय.डी. पासवर्ड दिले होते?

उत्तर दिले होते तसेच थंम्ब इंप्रेशन चालु होते.

बँकेने दिलेला आय.डी पर्सनल आय.डी. असतो. आय.डी. टाकल्यावर पासवर्ड विचारला जातो. मी स्वतःहुन सांगतो कर्मचारी कमी असल्यावर एकमेकांचा आय.डी. व पासवर्ड दिला जायचा व आरोपी आय.डी. व पासवर्ड वापरत होता. त्यावेळी थम्ब इंप्रेशन दिला जायचा. मी स्वतःहुन सांगतो की एकदा सकाळी थम्ब इंप्रेशन दिला तो संध्याकाळपर्यंत रहायचा.

प्रश्न – तुम्ही आय.डी. व पासवर्ड कोणाच्या आदेशाने देत होते?

उत्तर – आदेशाचा प्रश्न नाही. अधिकार ब्रँच मॅनेजर सांगायचे त्याप्रमाणे आय.डी व पासवर्ड देत होतो.

सेंट्रल बँकच्या रेग्युलेशन अनुसार आय.डी. व पासवर्ड तसा दुसऱ्यांना देता येत नाही. मी सांगतो की एमरजन्सीमध्ये देऊ शकतो. बँक कर्मचाऱ्यांच्या आय.डी. व पासवर्ड शिवाय व्यवहार होऊ शकतात का?

उत्तर – नाही.

प्रश्न – हा जो अपहार झाला आहे तो विना आय.डी. व पासवर्ड होऊ शकतो का?

उत्तर – विना आय.डी. व पासवर्ड हा अपहार झाला आहे व पासवर्ड टाकुनही झाला आहे.

प्रश्न – बँकेचे सॉफ्टवेअर वापरण्यासंदर्भात प्रशिक्षण कोणाला दिले जाते?

उत्तर – बँक कर्मचाऱ्यांना दिले आहे तसेच आरोपीलाही दिले आहे.

मी ते प्रशिक्षण घेतले होते.

प्रश्न – ज्या बँक कर्मचाऱ्याच्या आय.डी.वरुन व्यवहार झाला त्या बँक कर्मचाऱ्याची जबाबदारी असते?

उत्तर – त्या बँक कर्मचाऱ्याची पण जबाबदारी असते व बँक मॅनेजरची पण जबाबदारी असते.

हे म्हणणे खरे आहे की, ज्यावेळेस हा अपहार झाला त्यावेळी बँक कर्मचारी व मी बँकेत उपस्थित होतो. सदर अपहाराबाबत तक्रार बँकेत येण्याअगोदर बाकी काही तक्रार बँकेत आल्या नव्हत्या.

प्रश्न – फिक्स डिपॉझिटच्या पावत्या कोणाच्या ताब्यात असतात?

उत्तर– कॅशिअर व मॅनेजरच्या ताब्यात असतात. त्या मॅनेजरकडे ठेवल्या जातात. ठेवीदार आला तर त्याची प्रिंट मॅनेजर काढुन देत असतो.

हे म्हणणे खरे आहे की, मुदत ठेवीच्या सगळ्या प्रिंट मॅनेजर काढुन देत असतो. मी सांगतो की, लाईट गेली तर पावत्या हाताने लिहुन देत असतो. हे म्हणणे खरे आहे की, प्रत्येक मुदत ठेवीच्या पावतीची एंन्ट्री बँकेतील रेकॉर्डमध्ये असते.

प्रश्न – बँकेतील फिक्स डिपॉजिट पावत्या मिसिंग झाल्या होत्या का?

उत्तर – झाल्या होत्या.

हे म्हणणे खरे आहे की, त्या पावत्या सन २०१८, २०१९ व २०२० साली मिसिंग झाल्या होत्या.त्या पावत्या मिसिंग झाल्याबाबत पोलिस स्टेशनला बँकेने तक्रार

दिली होती किंवा कसे हे मला सांगता येणार नाही. त्या काळात बँकेचे शिक्के चोरी झाल्यासंदर्भात पोलिस स्टेशनला तक्रार दिली होती किंवा कसे हे मला सांगता येणार नाही. बँकेत सरप्राईज व्हीजिट होत असते व तेव्हा बँकेतील रेकॉर्ड तपासले जाते. त्या व्हीजिट दरम्यान काही अपहार उघडकीस आला होता का हे मला सांगता येणार नाही.

**उलटतपास मध्यान्हापर्यंत तहकुब.**

**<u>उलटतपास मध्यान्हानंतर शपथेवर पुन्हा सुरुः–</u>**

हे म्हणणे खरे आहे की, सेंट्रल बँक ऑफ इंडिया शाखा वडझिरे याचे दरवर्षी ऑडीट होत असते. सन २०१८, २०१९, २०२० व २०२१ साली ऑडिटमध्ये अपहार उघडकीस आला की नाही याबाबत मला सांगता येणार नाही. सन २०१८, २०१९, २०२० व २०२१ सालामध्ये पावत्या मिसिंग असल्याबाबत ऑडिटमध्ये तसे निघाले होते की नाही याबाबत मला माहित नाही. हे मला सांगता येणार नाही की, सन २०१८, २०१९, २०२० व २०२१ सालामध्ये पावत्या मिसिंग झाल्या होत्या की नाही. हे मला माहित नाही की, बँक मॅनेजर सिस्टीमध्ये पावत्या भरुन गौतम जाधवकडे लिहायला द्यायचे. हे म्हणणे खरे आहे की, गौतम जाधव यास बँकेमध्ये संगणक वापरण्याची अधिकृत परवानगी नव्हती. मी सांगतो की, तो अपरोक्ष संगणकचा वापर करत होता.

प्रश्न – तुम्ही किंवा मॅनेजरने आरोपी अपरोक्ष संगणकचा वापर करत असल्याबाबत तक्रार केली नाही?

उत्तर – तक्रार करण्याचा प्रसंग आला नाही. आरोपीने एफ.डी. संदर्भात पैसे घेतल्यानंतर उघडकीस आहे.

आरोपीने राजीनामा दिला होता का हे मला माहित नाही.

प्रश्न – तुम्ही व मॅनेजरने लोकांना आरोपीने राजीनामा दिल्याबाबत सांगितले नाही.

उत्तर – मॅनेजरने आरोपीने राजीनामा दिल्याबाबत लोकांना सांगितले का हे मला सांगता येणार नाही व मला आरोपीने राजीनामा दिला होता का हे माहित नाही.

मला जर माझे अक्षर दाखवले तर ते मला ओळखता येईल. आता मला दि.२२/०९/२०२० रोजीची अनाजी रंगनाथ खोसे यांच्या नावे असलेली दिड लाख रुपये बँकेत जमा केल्याची पावती दाखवण्यात आली. त्यावरील अक्षर माझे नाही. सदर पावतीस **ओळखीसाठी नि.७७** देण्यात येते.

प्रश्न – जर एखादा खातेदार बँकेत विथड्रॉवल स्लीप घेऊन स्वतः आला नाही किंवा

त्याच्या गैरहजेरीत पैसे विथड्रॉवल होऊ शकतात का.

उत्तर – जर खातेदाराने काही विनंती अर्जावरुन एमनजन्सीमध्ये काही कारणास्तव पैसे अर्जंट हवे आहेत असे कळवले तर विथड्रॉवल होऊ शकते.

एमरजन्सी नसेल तर पैसे खातेदाराच्या गैरहजेरीत देऊ शकत नाही. मी स्वतःहुन सांगतो की, ग्राहकांची आरोपीस पैसे देण्याची परवानगी असेल तर बँक पैसे देऊ शकते. हे म्हणणे खरे आहे की, जर मोठ्या रकमेची विथड्रॉवल स्लीप असेल आणि जर ग्राहक गैरहजर असेल तर त्या ग्राहकास संपर्क करुन आदी त्याबाबत विचारले जाते.

प्रश्न – चेकवर जर सेल्फ लिहिले असेल तर त्यासाठी पैसे काढण्यासाठी फक्त स्वतः ग्राहक हजर पाहिजे?

उत्तर – त्याची आवश्यकता नाही. ग्राहकाचे आईवडिल, नातेवाईक असेल तर पैसे देऊ शकतो.

सेल्फ लिहिलेल्या चेकवर मागील बाजुस कोणाही त्रयस्थ इसमाची सही असेल तर तो चेक वटत नाही. कोणताही व्यक्ती जर मोठी रक्कम विथड्रॉ करायला आला तर दोन लोकांचे ऑथोरायझेशन लागतात. त्यामध्ये बँक मॅनेजर व माझे म्हणजे कॅशिअरचे किंवा सेकन्ड मॅनचे ऑथोरायझेशन लागते.

प्रश्न – तुम्ही किती रकमेपर्यंत विथड्रॉवलचे ऑथोरायझेशन देऊ शकतात?

उत्तर – मी रुपये ३५,०००/– पर्यंत विथड्रॉवलचे ऑथोरायझेशन देऊ शकतो. त्यापुढे असणाऱ्या रकमेसाठी बँक मॅनेजर किंवा सेकन्ड मॅन यांचे ऑथोरायझेशन लागते. हे म्हणणे खरे आहे की, विथड्रॉवल ऑथोरायझेशनचा अधिकार बँक मित्राला नाही. हे म्हणणे खरे आहे की, मोठ्या रकमेचे विथड्रॉवल ऑथोरायझेशनचा अधिकार बँक मॅनेजर किंवा सेकन्ड मॅन यांना आहे. हे म्हणणे खरे आहे की, मोठ्या रकमेसाठी विथड्रॉवल ऑथोरायझेशन देणे हे एका व्यक्तीचे काम नाही. सन २०१९ साली सेंट्रल बँक शाखा वडझिरे येथे राजीव कुमार यांनी ऑडिट केले होते. हे मला माहित नाही की, ऑडिटर व बँक मित्र यांचा काही संबंध नसतो. हे म्हणणे खरे आहे की, ऑडिट रिपोर्टमध्ये राजीव कुमार यांनी ऑडिटमध्ये काय नमुद केले याबाबत मला माहित नाही.

हे म्हणणे खरे नाही की, गौतम जाधवचे खाते मी इनऑपरेटीव असलेले खाते ऑपरेटीव करण्यासाठी वापरत होतो.

प्रश्न – इनऑपरेटीव खाते ऑपरेटीव करण्यासाठी काय करावे लागते.

उत्तर – खातेदाराचे आधारकार्ड, पॅनकार्ड, बायोमॅट्रीकवर अंगठा घेतला जातो.

के.वाय.सी. करावी लागते व खाते ऑपरेटीव करण्यासाठी थोडी रक्कम भरुन घ्यावी लागते.

हे म्हणणे खरे नाही की, जी थोडी रक्कम भरुन घ्यावी लागते ती इनऑपरेटीव खात्यावरुन दुसऱ्या ऑपरेटीव खात्यावर भरुन घ्यावी लागते.

प्रश्न – बँकेचे ऑफीस बंद झाल असेल तर एखादा ग्राहकास लेट पेमेंट देता येऊ शकते का?

उत्तर – साहेबांची परवानगी घेऊन इमरजन्सी असेल तर लेट पेमेंट देऊ शकते.

हे म्हणणे खरे आहे की, लेट पेमेंट देण्यासाठी खातेदाच्या खात्यावर पैसे असणे गरजेचे आहे. लेट पेमेंट देण्यासाठी ग्राहकचे पॅनकार्ड, सही, पासबुक पडताळणी करुन घ्यावी लागते व व्यक्ती तोच आहे का याबाबत पडताळणी करुन घ्यावी लागते. हे म्हणणे खरे आहे की, ग्राहक स्वतः लेट पेमेंट मिळण्यासाठी बँकेत हजर राहणे गरजेचे आहे. हे म्हणणे खरे नाही की, लेट पेमेंटची नोंद लेट पेमेंट रजिस्टरमध्ये घेतली जाते. मी सांगतो की, लेट पेमेंटची नोंद कॅश रजिस्टरमध्ये घेतली जाते. हे म्हणणे खरे आहे की, लेट पेमेंट असेल तर त्या रजिस्टरमध्ये तसा शेरा, नोटांचे तपशील व साहेबांची सही घेतली जाते.

प्रश्न – गौतम जाधवच्या नावे तुम्ही कधी लेट पेमेंट दिले होते का?

उत्तर – हे मला आठवत नाही.

हे मला माहित नाही की, ज्या लोकांनी अपहाराबाबत तक्रार केल्या होत्या त्या लोकांना बँकेने पैसे परत दिले होते किंवा कसे. मी सांगतो की, माझी बदली झाल्यामुळे मला माहित नाही.

प्रश्न – तुमच्या पोलिसांसमोरील जबाबात "मी सध्या दि.०८/०३/२०२१ पासुन निलंबित आहे" असा मजकुर आला आहे याचे कारण तुम्हाला सांगता येईल का?

उत्तर – ते मी नाही सांगितले आहे. ते पोलिसांनी टाकले असेल. मला ठराविक प्रश्न विचारयचे व पोलिस टाईप करुन घ्यायचे.

हे म्हणणे खरे आहे माझा पोलिसांसमोरील जबाब मी सर्वच्या सर्व सांगितल्याप्रमाणे घेतलेला नाही.

प्रश्न – अपहाराबाबत तुम्हाला कळाल्यावर व सोनाली मॅडम किंवा उघडे मॅडम यांना कळाल्यावर तुम्ही किंवा त्यांनी आरोपीविरुध्द फिर्यादी का दाखल केली नाही.

उत्तर – आम्ही रिजनल ऑफिसला कळविले व तेथून रिजनल ऑफिसच्या साहेबांनी

फिर्याद दिली.

हे म्हणणे खरे नाही की रिजनल ऑफिसला कळविल्यानंतर त्यांनी आमच्या बँकेत प्रार्थमिक चौकशी केली. मी आता सांगतो की, त्यांनी प्रार्थमिक चौकशी केली होती.

हे मी सांगू शकत नाही की, प्रार्थमिक चौकशी नंतर बँक मॅनेजरवर निश्चिकाळजी पणाचा ठपका ठेवला गेला. हे म्हणणे खरे नाही की, प्रार्थमिक चौकशी माझ्यावर निश्चिकाळजी पणाचा ठपका ठेवण्यात आल्यानंतर मला तातपुरत्या स्वरुपात निलंबित करण्यात आले होते. आमची बँक कर्मचा–यांनी एक संघटना आहे. कर्मचाऱ्यांना काही अडचण आली तर ती संघटना आम्हाला मदत करत असते. हे म्हणणे खरे आहे की, मी तात्पुरत्या स्वरुपात निलंबित झाल्यावर मला संघटनेने मदत केली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्या संघटनेने वरीष्ठ अधिकाऱ्यावर दबाव आणुन माझ्या निलंबनाऐवजी माझी बदली केली. हे म्हणणे खरे नाही की, बँक मॅनेजर उघडे, कॅशिअर यांनीच हा सगळा अपहार केला असुन आमच्या कर्मचाऱ्यांच्या संघटनेने पोलिसांवर व आरोपीवर दबाव टाकुन हा खोटा गुन्हा दाखल केला आहे.

प्रश्न – फिर्यादी एन.के.पांडा यांनी ब्रँच मॅनेजर व कॅशिअर यांनी अपहार केल्याचे उघडकीस आल्यामुळे त्यांनी सदर फिर्याद दाखल केली?

उत्तर – ग्राहकांच्या तक्रारींवरुन एन.के.पांडा यांनी फिर्याद दाखल केली.

सन २०२० साली असलेले ब्रांच मॅनेजर संदिप बिराजदार यांना मी ओळखतो. हे म्हणणे खरे आहे की, सन २०२० मध्ये सेंट्रल बँक शाखा पारनेर येथे घनश्याम किसन औटी कामास होता. सुखदेव बाळाजी चौधरी, प्रमिला जयसिंग शेंडकर, तुकाराम कोडींबा तिकोने, ज्ञानदेव बबन निघोट, रंजना दत्तात्रय मोरे, दत्तात्रय रामु मोरे, अक्षय तोडकर, शिवाजी बाबुराव साठे यांना मी ओळखतो. ते बँकेत खातेदार असल्याने त्यांची माझ्याशी नियमित ओळख आहे. ते खातेदार बँकेतील व्यवहारांबाबत बँकेत येत असतात. हे म्हणणे खरे आहे की, ते खातेदार बँकेत आल्यावर त्यांना मदत लागल्यास मी त्यांना मदत करायचो. हे म्हणणे खरे आहे की, बँकेत पैसे काढण्यासाठी किंवा भरण्यासाठी व्यक्ती कॅशिअरकडे जात असतो. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासात माझे कधीही निलंबन झाले नसल्याचे मी खोटे सांगितले आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासात नमुद की, गौतम जाधव हा पैसे देवाण घेवाणचे काम करीत होता, हे मी खोटी सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासात नमुद की, बँकेतील ग्राहक त्यांचे काम लवकर होण्यासाठी गौतम जाधवकडे बँकेत जायचे व

त्यांनी दिलेले पैसे तो त्याच्या खात्यावर वर्ग करायचा, हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासात नमुद की, सोनाली मॅडमाने त्या ग्राहकास पावती पाहुन सांगितले की, तुमचे अकाऊन्ट नाही, तुमच्या नावावर पैसे नाही, ही पावती तुम्हाला खोटी दिली आहे. त्यांनी ती पावती कॉम्प्युटरवरुन पाहिली. त्या ग्राहकाने मॅनेजरकडे आमच्या शाखेत तक्रार केली व त्यानंतर हेड ऑफिस एम.आय.डी.सी सावेडी येथे तक्रार केली, हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, गौतम जाधव माझी आय.डी. व पासवार्ड परस्पर वापरत असल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, ब्रँच मॅनेजर यास जर एखाद्या खातेदाराचे खाते पहायचे असेल किंवा हाताळायचे असेल तर ब्रँच मॅनेजर ते पाहु शकतो. हे म्हणणे खरे नाही की, गौतम जाधवच्या खात्यावर जमा झालेली रक्कम ब्रांच मॅनेजर यांनी गौतम जाधवचे खाते वापरुन ट्रान्सफर केली. हे म्हणणे खरे आहे की, सदर घटना झाल्यानंतर माझी व इतर कर्मचाऱ्यांची इनक्रीमेंट थांबवली. हे मला माहित नाही की, माझी व बँकेतील कर्मचाऱ्यांची इनक्रीमेंट थांबवल्यानंतर त्याची रक्कम ही ग्राहकांना देण्यात आली. माझ्या ३४ वर्षाच्या नोकरीत माझी एकदाही इनक्रीमेंट थांबवली नाही. हे म्हणणे खरे नाही की, २००७ साली गोण्याल शाखा अधिकारी असताना माझ्या विरुध्द तेव्हा इनक्रीमेंट थांबवली होती. हे म्हणणे खरे आहे की, सरव्हीस रेकॉर्डमध्ये इनक्रीमेंट थांबवल्याचा उल्लेख असतो. इनक्रीमेंट थांबवल्याचा उल्लेख वरीष्ठ ऑफिसकडे असतो. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासात जे मी गौतम जाधव यांनी अपहार केल्याबाबत सांगितले, ते मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, एफ.डी.च्या पावत्यांची कस्टडी आमच्या बँकेकडे असते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या ताब्यातील एफ.डी.च्या पावत्या चोरी गेल्याबाबत मी पोलिस स्टेशनला मी कधी तक्रार केली नाही. दि.२०/०५/२०२१ रोजी मी तक्रारी अर्ज दिला होता. हे म्हणणे खरे आहे की, दि.२०/०५/२०२१ अगोदर तसा तक्रारी अर्ज मी दिला नाही. हे म्हणणे खरे नाही की, ज्यावेळी मला कळाले की मी अपहारामध्ये गुंतलो आहे त्यावेळेसच मी तो तक्रारी अर्ज केला. हे म्हणणे खरे नाही की, मी शाखा अधिकारी व बँकेतील इतर कर्मचाऱ्यांनी स्वतः अपहार केला व आमच्या ताब्यात कागदपत्र असल्याचा गैरफायदा घेऊन आम्ही गौतम जाधव यास सदर गुन्ह्यात गुंतवले. हे म्हणणे खरे नाही की, गोरक्ष अनाजी खोसे, तुळशीराम मंजाबा सपकाळ, सुखदेव बाळाजी चौधरी, प्रमिला जयसिंग शेंडकर, तुकाराम कोडींबा तिकोने, ज्ञानदेव बबन निघोट, रंजना दत्तात्रय मोरे, दत्तात्रय रामु मोरे,

अक्षय तोडकर, शिवाजी बाबुराव साठे यांच्याशी माझी ओळख असल्याने त्या ओळखीचा मी व बँक अधिकाऱ्यांनी फायदा घेऊन त्या खातेदारांना आमचे नाव न गुंतवण्याबाबत विनंती केली व त्यामुळे गौतम जाधव यास आम्ही सदर गुन्ह्यात विनाकारण गुंतवले. हे म्हणणे खरे नाही की, सुखदेव बाळाजी चौधरी, प्रमिला जयसिंग शेंडकर, तुकाराम कोडींबा तिकोने, रंजना दत्तात्रय मोरे, दत्तात्रय रामु मोरे, यांच्या तक्रारी अर्जामध्ये माझे नाव नमुद असल्याने मी त्यांना माझे नाव काढण्यास विनंती केली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी वरील सर्व साक्षीदारांना भेटुन त्यांना मॅनेज करुन व आमच्या संघटनेमार्फत पोलिसांवर दबाव आणुन गौतम जाधव यास खोट्या गुन्ह्यात गुंतवले. हे म्हणणे खरे नाही की, मी, सोनाली मॅडम व उघडे मॅडम यांनी कट करुन हा अपहार केला व गौतम जाधव यास बँक मित्र म्हणुन गुन्ह्यात गुंतवले. रुपाली जाधव तिची एफ.डी. बंद करण्यासाठी माझ्या समोर आली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मी व मॅनेजर यांनी रुपाली जाधवची पावती तयार केली व त्यावरील पावतीचा नंबर बाकी लोकांच्या पावतीवर टाकला. हे म्हणणे खरे नाही की, इनऑपरेटीव खाते ऑपरेटीव करण्यासाठी मी गौतम जाधवचे खाते वापरले. हे मला माहित नाही की, बँकेतील खातेदारांना वरीष्ठ अधिकाऱ्यांनी त्यांच्या ऑफिसमध्ये बोलावुन त्यांना वाढीव रकमेचे आमिश दाखवुन गौतम जाधव विरोधात साक्ष द्यायला सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, गौतम जाधवने असा कोणताही अपहार केलेला नाही व मी खोट्या पावत्या तयार केल्या आहेत.

उलटतपास संपला.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृती

सही/-

(एन.एस.सबनीस)

दिनांकः १३/११/२०२४. न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग, कोर्ट नं.३,

पारनेर.